**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र. २, तुळजापूर यांचे न्यायालयात**
**फौजदारी किरकोळ अर्ज क्रं. २०५/२०२२**

**सुरेखा संदीपान कदम ... अर्जदार**

**विरुध्द**

**शिवाजी रामचंद्र कदम व ईतर ७ ... गैरअर्जदार**

**निशाणी १ खालील आदेश.**

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने आरोपी क्रं. १ ते ८ यांच्या विरुध्द भा.द.वि कलम ३२३, ३२४, ५०४, ५०६ सह ३४ प्रमाणे गुन्हा नोंद होवून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १५६(३) अन्वये तपास करण्याचे आदेश संबंधित पोलिस ठाणेस देणे करीता केला आहे. प्रस्तुत अर्जासोबत मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ***प्रियंका श्रीवास्तव वि. उत्तर प्रदेश सरकार*** **(२०१५) ६ एस.सी.सी. २८७** या न्याय निवाड्यातील मार्गदर्शक तत्वांनुसार अर्जदाराचे शपथपत्र जोडले आहे.

२. अर्जदाराचे कथनांनुसार दिनांक १७/०५/२०२२ रोजी ती तिच्या घरासमोर काम करत असताना आरोपी क्रं. १ ते ८ हे तेथे आले व त्यांनी मागील भांडणांची कुरापत काढून तु आमच्या विरुद्ध पोलीस केस करतेस काय, ती केस माघारी घे नाही तर तुला जिवंत सोडणार नाही असे म्हणुन आरोपी क्रं. २, ५ व ८ यांनी अर्जदाराच्या केसाला धरुन खालीपाडून लाथाबुक्याने मारहाण केली व आरोपी क्रं. ३ याने अर्जदारास दगडाने मारहाण केली व आरोपी क्रं. १, ६ व ८ याने अर्जदारास धक्काबुक्की करुन जिवे मारण्याची धमकी दिली. तसेच आरोपी क्रं. ४ हिने अर्जदाराच्या गालावर चापटाने मारहाण केली. तेंव्हा अर्जदाराने आरडाओरडा केला त्यावेळी साक्षीदार क्रं. १ व २ हे तेथे धावत आले व त्यांनी आरोपीच्या तावडीतुन अर्जदाराची सुटका केली. तेंव्हा आरोपी क्रं. १ ते ८ यांनी अर्जदारास अश्लील भाषेत शिविगाळ करत जिवे मारण्याची धमकी देवून तेथुन निघून गेले. अर्जदाराचा पती हा दुधाचा व्यवसाय करतो व सोलापूर येथे दुध घेवून जातो. आरोपी क्रं. ३ याने तुला सोलापूर हून येता जाताना गाडी खाली घालून कायमचे संपवून टाकू अशी जिवे मारण्याची धमकी दिली. अर्जदाराने पो.स्टे. तामलवाडी येथे जावून आरोपी विरुध्द तक्रार देण्यासाठी गेली असता संबंधीत पोलिसांनी अर्जदाराची तक्रार नोंद करुन न घेता अर्जदारास न्यायालयात जावून दाद मागण्याची समज दिली. सबब, अर्जदाराने प्रस्तुतचा खटला दाखल केला आहे आणि आरोपी क्रं. १ ते ८ विरुध्द गुन्हा नोंद होवून फौ.प्र.सं. कलम १५६(३) अन्वये तपास होण्याचे आदेश करण्याची विनंती या अर्जाद्वारे केली आहे.

३. अर्जदाराने त्यांच्या अर्जाच्या पृष्ठर्थ गुन्हा क्रं. ४२/२१ ची झेरॉक्प्रत दाखल केली आहे.

४. अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. पी. बी. कोळेकर यांचा युक्तिवाद ऐकला.

५. अर्जदाराने पस्तुतचा अर्ज भा.द.वि. कलम ३२३, ३२४, ५०४, ५०६ सह ३४ प्रमाणे दाखल केलेला आहे. मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी वेळो वेळी त्यांच्या न्यायनिर्णयामध्ये सांगितले आहे की, १५६(३) नुसार अर्ज करण्याच्या आधी तक्रारदारास १५४(१) नुसार संबंधीत पोलीस स्टेशनला तक्रार अर्ज करावा लागेल. जर संबंधीत पोलीस अधिका–याने सदरचा तक्रार अर्ज स्वीकार केला नाही तर फौ.प्र.सं. कलम १५४(३) नुसार तक्रारदारास संबंधीत पोलीस अधिक्षकाकडे लेखी स्वरुपात आणि डाकेने तक्रार अर्ज करण्याचे सांगितले आहे. प्रस्तुतच्या प्रकरणात अर्जदाराच्या कथनानुसार त्यांनी पोलीस स्टेशन, तामलवाडी येथे जावून आरोपी विरुध्द तक्रार देण्यासाठी गेले असता संबंधीत पोलीसांनी तक्रार नोंद न करुन घेता तक्रारदारास कोर्टात जाण्याची समज दिली. परंतु सदरच्या म्हणण्या पृषठयार्थ त्यांनी अभिलेखावर कुठल्याही स्वरुपाचा कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. त्यामुळे वरील न्यायनिर्णयानुसार त्यांनी १५४(१) व १५४(३) ची पुर्तता केल्याचे दिसुन येत नाही.

६. वरील विवेचनाचा विचार करता या न्यायालयास फौ.प्र.स. कलम १५६ (३) प्रमाणे असलेले अधिकार वापरण्याजोगी परीस्थिती नाही. सबब, खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्जदाराची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १५६(३) अन्वये गुन्हा नोंद करुन तपास करावा असे आदेश देण्याची विनंती नामंजुर करण्यात येत आहे.

२. प्रकरण फिर्यादीच्या पडताळणीसाठी लावावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by KULDIP SUBASH KULKARNI
Date: 2023.04.20 15:07:36 +0530

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, तुळजापूर
(न्यायालय क्र. २)

दिनांक – १९.०४.२०२३.